**गरीब व गरजू व्यक्तिंना स्वस्त दरात "शिवभोजन" उपलब्ध करुन देण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
**शासन परिपत्रक क्रमांक - शाभोथा-२०१९/प्र.क्र.५१/नापु-१७**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक- ०६ जानेवारी, २०२०

**वाचा** :-शासन निर्णय क्रमांक - शाभोथा-२०१९/प्र.क्र.५१/नापु-१७, दि. ०१ जानेवारी, २०२०

**प्रस्तावना:-**

राज्यातील गरीब व गरजू जनतेला सवलतीच्या दरात शिवभोजन उपलब्ध करून देण्यासाठी या विभागाने दि. ०१ जानेवारी, २०२० रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी सुरळीतपणे करण्यासाठी तसेच सदर योजना दिनांक २६ जानेवारी २०२० रोजीपासून अंमलात आणण्याकरिता पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

**परिपत्रक** :-

या योजनेची पूर्वतयारी करण्यासाठी वेळापत्रक पुढीलप्रमाणे राहील:-

| कालावधी | कार्यपद्धती |
| --- | --- |
| दि. ६ ते दि.१० जानेवारी, २०२० (भोजनालयांची निवड करणे) | जिल्हा पुरवठा अधिकारी/ अन्नधान्य वितरण अधिकारी/ उपनियंत्रक शिधावाटप यांनी पाठविलेल्या भोजनालयांच्या प्रस्तावावर जिल्हाधिकारी/ नियंत्रक शिधावाटप व संचालक यांचे अध्यक्षतेखाली समितीने सक्षम भोजनालयांची निवड करून शासनास कळविणे. |
| दि. १३ ते १८ जानेवारी, २०२० (भोजनालयचालकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम) | अन्न व औषध प्रशासन, स्थानिक नगरपालिका/ महानगरपालिका/ सार्वजनिक आरोग्य विभाग/ गृहविज्ञान/ तंत्रनिकेतन/ हॉटेल मॅनेजमेंट यांनी खाली नमूद केलेल्या बाबींसाठी प्रशिक्षण आयोजित करावे. तसेच सदर भोजनालय चालविण्यासाठी आवश्यक असलेल्या शासकीय/ |

Scanned by CamScanner

| | |
|---|---|
| | निमशासकीय यंत्रणांचे परवान्याबाबत भोजनालय चालकास अवगत करावे व याबाबत सर्व बाबींची पूर्तता करवून घ्यावी. |
| दि.२० ते २४ जानेवारी, २०२० | सदर योजनेचा प्रारंभ दि.२६ जानेवारी, २०२० रोजी करण्याच्या अनुषंगाने स्थानिक समितीने सर्व पुर्वतयारी करून घ्यावी तसेच सदर भोजनालय चालकांनी आवश्यक असलेले शासकीय/ निमशासकीय यंत्रणांचे परवाने प्राप्त करुन घेतले आहेत याची खात्री करून कार्यारंभ आदेश द्यावेत. दि.२६ जानेवारी, २०२० पासून सदर योजनेची अंमलबजावणी होईल याची दक्षता घ्यावी. |

प्रशिक्षण कार्यक्रम :-

१. अन्न व औषध प्रशासन विभागातील अधिकाऱ्यांनी अन्नाचा दर्जा उत्तम राखण्यासाठी, अन्न भेसळ रोखण्यासाठी तसेच सदर शिवभोजन थाळी बनवण्यासाठी बाजारातून लागणारे साहित्य / सामग्री घेताना सदरील अन्नघटक खाण्यायोग्य असल्याबाबत करावयाच्या खात्री संदर्भाने प्रशिक्षण देणे.

२. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी पोषक तत्वे असलेल्या भाज्यांची निवड करण्याबाबत प्रशिक्षण घ्यावे तसेच ग्राहकांच्या आरोग्याच्या हितकारक बाबींविषयी भोजनालय चालकास मार्गदर्शन करावे.

३. स्थानिक महानगरपालिका / नगर पालिका अधिकाऱ्यांनी ओला व सुका कचरा वेगळा करणे, भोजनालय परिसरात डास, कीटक इत्यादी उपद्रवकारक किटाणूची वाढ न होऊन परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत मार्गदर्शन करावे.

४. गृह विज्ञान/ हॉटेल मॅनेजमेंट/ तंत्रनिकेतन विद्यालय/ औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतील प्राध्यापकांना रुचकर, स्वच्छ स्वयंपाक बनविण्याच्या अनुषंगाने स्थानिक समित्यांनी प्रशिक्षणासाठी निमंत्रित करून भोजनालय चालकांसाठी प्रशिक्षण आयोजित करावे.

Scanned by CamScanner

५. प्रशिक्षणावेळी सदर भोजनालय चालविण्यासाठी आवश्यक असलेल्या शासकीय/ निमशासकीय यंत्रणांचे परवान्याबाबत भोजनालय चालकास अवगत करावे व याबाबत सर्व बाबींची पूर्तता करवून घ्यावी.

- शिवभोजन देणाऱ्या भोजनालयांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विविध अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या :-

१. जिल्हाधिकारी/ नियंत्रक शिधावाटप व संचालक यांनी महिन्यातून एकदा काही भोजनालयांना भेटी देऊन आढावा घ्यावा व त्याबाबतचा अहवाल शासनास विनाविलंब सादर करावा. तसेच ही योजना राबविण्यासाठी असलेल्या यंत्रणेतील अधिकारी/ कर्मचारी यांनी केलेल्या कामाचाही आढावा घ्यावा.

२. जिल्हा पुरवठा अधिकारी/ अन्नधान्य वितरण अधिकारी/ उपनियंत्रक यांनी पंधरा दिवसातून एकदा या भोजनालयांना भेटी देऊन आढावा घ्यावा व त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी/ नियंत्रक शिधावाटप व संचालक यांना सादर करावा. तसेच ही योजना राबविण्यासाठी असलेल्या यंत्रणेतील अधिकारी/ कर्मचारी यांनी केलेल्या कामाचाही आढावा घ्यावा.

३. शिधावाटप अधिकारी/पुरवठा निरीक्षण अधिकारी यांनी आठवड्यातून एकदा या भोजनालयांना भेटी देऊन आढावा घ्यावा व त्याबाबतचा अहवाल जिल्हा पुरवठा अधिकारी यांना विनाविलंब सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(दीपक केंद्रे)
अवर सचिव

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त
२. सर्व जिल्हाधिकारी
३. नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई
४. वित्तिय सल्लागार व उपसचिव (अ.ना.पु. व ग्रा.सं) पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई
५. उपसंचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त कार्यालय मुंबई
६. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी/ सर्व उपनियंत्रक शिधावाटप, मुंबई
७. सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी
८. निवड नस्ती, नापु-१७.

Scanned by CamScanner